PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Shejari shejari
Year: 1990

Song: Shanbhar nambari shuddha
Lyricist: Pravin Davane

शंभर नंबरी शुद्ध सज्जन
कुणी कधी का पाहिलाय
शंभर नंबरी शुद्ध सज्जन
कुणी कधी का पाहिलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
शंभर नंबरी शुद्ध सज्जन
कुणी कधी का पाहिलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
शंभर नंबरी जंटलमॅन
ज ज ज जंटलमॅन
टिंग टाँग

भित्रटपणा बावळटपणा
दिलाय फेकून दूर
तुम्ही ही आता माझ्या सूरात
खुशाल भरा सूर
जाहीरात आजकाल मॉडेलशिवाय
मुळीच झळकत नाही
ब्रेड असो वा ब्लेड असो
मॉडेल हवी बाई
त्यांना मॉडेल हवी बाई
कधी नव्हे ती पायी आमच्या
कधी नव्हे ती पायी आमच्या
दुनिया आली झुकत
चित्रामधल्या चटक चांदण्या
मलाच बसल्या बघत

दूर सारून त्या बाईला
एक बुवा आलाय
हां एक बुवा आलाय
शंभर नंबरी शुद्ध सज्जन
कुणी कधी का पाहिलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
शंभर नंबरी जंटलमॅन
ज ज ज जंटलमॅन
टिंग टाँग

कशी ही असो वस्तू आत
पॅकींग झगमगणारे
त्या पॅकींगच्या गुणास गाती
पैसे छनछननारे
बावनकशी सोन्याची
कळली आता किम्मत
सश्यासारख्या सज्जनतेला
वाघोबाची हिम्मत
हा हा वाघोबाची हिम्मत
समजू नका तोल जातोय
तालात आहे सारं
माझ्यासाठी उघडी झाली
आता जगाची दारं
डोक्यावरच्या केसापासून
पायामधल्या चपलेपर्यंत
मीच दिसेन आता
द्या टाळी हो सज्जनतेला
गुण हे गाता गाता
सज्जनतेचा झेंडा हाती मीच उभारलाय

हो हो मीच उभारलाय
माझ्यासारखा शुद्ध सज्जन
कुणी कधी का पाहिलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
शंभर नंबरी शुद्ध सज्जन

कुणी कधी का पाहिलाय
तुमच्यामधला एक असा
हा रूबाबात आलाय
शंभर नंबरी जंटलमॅन
ज ज ज जंटलमॅन
टिंग टाँग

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*